# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०– २५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे–४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०–२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ–मेल : dyracademic@unipune.ac.in

संदर्भ क्र. : सीसीओ/१२८०

दिनांक : १३/०६/२०२०

## परिपत्रक क्र.११६ / २०२०

कोव्हिड १९ च्या प्रार्दुभावामुळे २४ मार्च २०२० पासून संपूर्ण देशात टाळेबंदी लागू आहे. तसेच शासनाने साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ व आपतकालीन कायदा २००५ ही लागू केलेला आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठ विभाग, संलग्न महाविद्यालये व परिसंस्था यांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आरोग्य हिताच्या उद्देशाने Work from Home व Interim Vacation संबंधीची परिपत्रके विद्यापीठाकडून यापूर्वी निर्गमित करण्यात आली होती.

लॉकडाउनच्या काळात कोव्हिड १९ मुळे उद्भवलेल्या कठीण परिस्थितीत आपण सर्व विद्यार्थीहित व समाजहित डोळयासमोर ठेवून विविध पध्दतीने कार्यरत आहोत. या कालावधीत महाविद्यालय व विद्यापीठाचे कामकाज काही प्रमाणात चालू ठेवण्याच्या कामी आपण दिलेले योगदान प्रशंसनीय आहे.

महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या 'Mission Begin Again' आवाहनानुसार विद्यापीठ व महाविद्यालये येथील कार्यालयीन प्रशासन व शैक्षणिक प्रशासन प्रत्यक्ष स्वरूपात सुरू झाले आहे. संलग्नता, शासन, विद्यापीठ, युजीसी यांच्याकडे विविध प्रस्ताव/अहवाल पाठविणे, महाविद्यालयीन सुविधा व संसाधने अद्ययावत करणे, अंतिम वर्ष सोडून इतर वर्षांचे निकालाचे काम पूर्ण करणे, विद्यापीठाकडे निकाल विषयक माहिती सादर करणे, IQAC ची प्रलंबित कामे पूर्ण करणे, E Content विकसित करणे इत्यादी कामांना सुरूवात झालेली आहे. हे काम करत असताना सर्व शिक्षक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे सहकार्य अतिशय महत्वाचे आहे.

जी महाविद्यालये प्रतिबंधित क्षेत्रात आहेत किंवा जे शिक्षक/प्रशासकीय कर्मचारी प्रतिबंधित क्षेत्रात वास्तव्यास आहेत. अशा कर्मचाऱ्यांकडून योग्य तो अर्ज स्वीकारून Work from Home ची सोय उपलब्ध करून द्यावी. प्रशासकीय कर्मचारी/शिक्षक यांचेपैकी कोणी रेड झोन/कंटेनमेंट झोन यामध्ये असल्यास त्यांनी घरून आवश्यकतेनुसार काम

करणे अपेक्षित आहे तसेच अशा कर्मचाऱ्यांनी सत्राच्या प्रथम दिवशी हजेरीपत्रकावर स्वाक्षरी करणे सक्तीचे करू नये.

**विद्यापीठ अनुदान आयोग आणि महाराष्ट्र शासन यांनी निर्देशित केल्याप्रमाणे प्रथम वर्षाचे अध्यापन १ सप्टेंबर, २०२० आणि इतर सर्व वर्षांचे अध्यापन १ ऑगस्ट, २०२० पासून (ऑनलाईन/ऑफलाईन) पध्दतीने सुरू करण्याचे प्रस्तावित आहे.** शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर प्रत्यक्ष अध्यापनाचे (online/offline) काम सुरू होण्यापूर्वी शिक्षकांनी E Content तयार करणे, नवीन अभ्यासक्रम अंमलबजावणीसाठी आवश्यक ती पूर्वतयारी जूनचा उत्तरार्ध आणि जुलै महिन्यात करणे अपेक्षित आहे. (online/offline) अशा संयुक्त पध्दतीने शिकवण्याची तयारी करताना विद्यार्थी संख्या, बॅचेस त्यासाठी आवश्यक असणारे तंत्रज्ञान, विद्यार्थ्यांकडे उपलब्ध असणारी साधने यांचा अभ्यास करून, प्रत्येक विद्यार्थी शिक्षण प्रक्रियेत कशाप्रकारे सहभागी होऊ इच्छितो यासाठी पूर्वतयारी करणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांसाठी मुडल/गुगल क्लास रूम/लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीमचा वापर करून शिक्षणाची प्रक्रिया सुव्यवस्थित होण्यासाठी पुरेशी पूर्वतयारी करणे अपेक्षित आहे. त्यासाठी महाविद्यालयांनी/ परिसंस्थांनी सुस्पष्ट आराखडा तयार करणे आणि त्याची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. १ ऑगस्ट पूर्वी अशा सर्व माध्यमांची चाचपणी करून विद्यार्थ्यांचा प्रतिसाद/अडचणी समजून घ्याव्यात म्हणजे अध्यापन (online/offline) परिणामकारक पध्दतीने सुरू करणे शक्य होईल.

सबब, उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

13/06/2020

सहायक कुलसचिव,
शैक्षणिक विभाग

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ )
गणेशखिंड पुणे – ४११००७. )
जा.क्र. सीसीओ/ ९२६० )
दिनांक – १३ जुन, २०२० )

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्था,
पुणे, अहमदनगर, नाशिक.